# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

### गुरुवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ / आश्विन १८, शके १९४६

### ९६. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-

विधानसभेचे सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २६६ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १२४ निवेदने मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण १४२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४४ निवेदने सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक २६ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ८ सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ३७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. एकूण ९० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०६ सोमवार, दिनांक १३ जून, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ४२ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. एकूण ८४ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १० सोमवार, दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ९० अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ७४ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०९ निवेदने शाखेत प्राप्त झाली उर्वरित प्रलंबित ६५ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्माननीय विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीनेउत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

१. संगणक कक्ष (website.)

२. अनुवाद कक्ष

३. प्रतिवेदन

लक्षवेधी सूचना क्रमांक-२३९१ गृह (परिवहन) विभाग/परि-४

# महाराष्ट्र विधानसभा

सन -२०२३ चे हिवाळी आधिवेशन

श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेले लक्षवेधी सूचना क्रमांक २३९१ पुढीलप्रमाणे आहे:-

"गुजरात सीमेवरील तलासरी (दापेचरी) (जि.पालघर) येथील आरटीओ चेकपोस्टवर परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वाहनांना मोठया प्रमाणात बिना पावती प्रवेश देऊन खाजगी वसुली करण्यात येऊन यामध्ये अर्थिक घोटाळा करण्यात येत असल्याचा प्रकार निदर्शनास येणे, ओव्हरलोड ट्रकची खाजगी वसुली २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत करण्यात येणे, कागदपत्रे ओके असली तरी हजार रुपयापर्यंत बिन पावतीचा प्रवेश द्यावा लागणे, ठाणे परिवहन अधिकारी व त्यांचे संबधित अधिकारी यांचे अशिर्वादाने तलासरी चेकपोस्टवर बेकायदेशीररित्या वसुलीचे रॅकेट सुरु असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे. या रस्त्यावर आरटीओचे अधिकारी, कर्मचारी हे सरकारी गणवेश न घालता साधे कपडे घालून वसुली करीत असणे, विक्रमगडचे लोकप्रतिनिधींनी चेकपोस्टवरील अवैध वसुलीबाबत केंद्र व राज्याचे मुख्यमंत्री यांचेकडे लेखी तक्रार केली असणे, लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून मोटार वाहन निरीक्षक यांना लाच घेताना रंगेहात पकडणे, चेकपोस्टवरील अवैध वसुली करुन अर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी अद्याप कोणतीच कारवाई करण्यात न येणे, यास्तव ठाण्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यासह तलासरी पोस्टचे मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरक्षक, फ्लाईंग स्कॉड अधिकारी यांना तातडीने निलंबित करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

## निवेदन

{श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

तलासरी (दापचेरी) जि.पालघर पुर्णपणे अत्याधुनिक असून महाराष्ट्र शासनाच्या संगणकीकरण व आधुनिकिरण प्रकल्पान्वये उभारणी करण्यात आला आहे. सदर सीमा तपासणी नाक्यावर महाराष्ट्र शासन व परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी विहित केलेल्या आदर्श कार्यप्रणाली व वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रक / आदेशान्वये कामकाज चालते. सदरचा सीमा तपासणी नाका हा पुर्णपणे सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून जोडलेला असून या ठिकाणी सेवापुरवठादाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सीमा तपासणी नाका येथे राज्य शासनाच्या गृह (परिवहन) विभागाच्या अधिसूचनेप्रमाणे राज्यातून परराज्यात जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांची तपासणी वजनकाटयाव्दारे केली जाते व त्याचे सेवाशुल्क वसूल केले जाते. तसेच वजन करण्यात आलेल्या सर्व वाहनांना वजन केलेली पावती देण्यात येते. सदरचे कामकाज मे.महाराष्ट्र बॉर्डर चेक पोस्ट नेटवर्क लि. या कंपनी मार्फत करण्यात येते. सीमा तपासणी नाक्यावर सेवा पुरवठादाराचे

कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, लेन मार्शल, ठेकेदारांचे दुरुस्ती करणारे कामगार यांचा वावर असतो. सीमा तपासणी नाक्यावर मोटार वाहन विभागाचे नियुक्त करण्यात आलेले मोटार वाहन निरिक्षक हे विहीत गणेवेश परिधान करुनच कर्तव्यावर हजर असतात.

सदरचा सीमा तपासणी नाका हा २४ X ७ पुर्ण वेळ कार्यरत आहे. सीमा तपासणी नाका येथे परराज्यातून महाराष्ट्र राज्यात येणाऱ्या वाहनांची व महाराष्ट्र राज्यातून पर राज्यात जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येते. दोषी आढळून आलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायदा व तदअनुषंगिक नियमांनुसार कार्यवाही करण्यात येते.

तलासरी (दापचेरी) जि.पालघर सीमा तपासणी नाक्यावर केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | तपासण्यात आलेली वाहने | दोषी वाहन | दंड व कर वसूली (एकूण लाखात) |
|---|---|---|---|
| २०२२-२०२३ | १८,०२,२०७ | २,६१,१८२ | ५,४५८.२९ |
| माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ (प्रगतीपर) | १२,२०,५१५ | १,२३,७१७ | ३३३५.०९ |

तलासरी (दापचेरी) जि.पालघर सीमा तपासणी नाक्यावर लाल परावर्तक न लावता वाहतूक करणाऱ्या वाहनांवर केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दोषी वाहने | दंड व कर वसूली (एकूण लाखात) |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ३३,९४८ | ३३.९४ |
| माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ (प्रगतीपर) | १६,०८१ | १६.०८ |

तलासरी (दापचेरी) जि.पालघर सीमा तपासणी नाक्यावर मालवाहू वाहनांतून जनांवरांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दोषी वाहने | दंड व कर वसूली (एकूण लाखात) |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | १३,०५४ | १३०.०० |
| माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ (प्रगतीपर) | ६,१८२ | ६१.८२ |

तलासरी (दापचेरी) जि.पालघर सीमा तपासणी नाक्यावर अवैध प्रवासी बसेसवर, वाहनांवर केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दोषी वाहने | दंड व कर वसूली (एकूण लाखात) |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ४,९४० | २२२.०० |
| माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ (प्रगतीपर) | ५,८५७ | २६३.०० |

तलासरी (दापचेरी) जि.पालघर सीमा तपासणी नाक्यावर संगणकीय प्रणालीवर आधारित अत्याधुनिक वजन काटे बसविण्यात आले आहेत. भारक्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करताना आढळून आल्यास सेवा पुरवठादारामार्फत सदर वाहने परिवहन विभागास

पुढील कार्यवाहीकरिता पाठविली जातात. सीमा तपासणी मोटार वाहन निरीक्षक यांचेकडून वाहनांची तपासणी करुन मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ११३ व कलम ११४ नुसार चालक तसेच वाहन मालक यांचे विरुध्द कारवाई करण्यात येते. तसेच, शासन अधिसूचना दि.२६.११.२०२१ अन्वये तडजोड शुल्क वसूली करण्यात येते. सर्व सीमा तपासणी नाक्यांसाठी परराज्यातून राज्यामध्ये व राज्याधून परराज्यात जाणाऱ्या वाहनांची तपासणी करणेकरिता महाराष्ट्र शासनाव्दारे SITANA-१०१६/ER४७३/-४ Date.२५.०१.२०१७ रोजी आदर्श कार्यप्रणाली देण्यात आलेली आहे. सदर कार्यप्रणालीनुसार सीमा तपासणी नाका तलासरी (दापचेरी) येथे Checking of Paper व Checking of Vehicle नुसार तपासणी केली जाते.

तलासरी (दापचेरी) जि.पालघर सीमा तपासणी नाक्यावर भार क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक (ओव्हरलोड) करणाऱ्या वाहनांवर केलेल्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दोषी वाहने | दंड व कर वसूली (एकूण लाखात) |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ५,४०८ | १४८५.०० |
| माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२३ (प्रगतीपर) | ३,७६० | ९६१.०० |

श्री. निळोबा ज्योतिबा तांदळे हे मोटार वाहन निरक्षक या पदावर प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे येथे दि.१८.०८.२०२१ पासून कार्यरत आहेत. श्री.तांदळे, मोटार वाहन निरीक्षक हे सीमा नाका, तलासरी (दापचेरी) येथे कर्तव्य बजावत असताना त्यांनी खाजगी इसम श्री. सुनिल सदाशिव भोईर यांच्या संगनमताने वाहन तपासणी करताना वाहनावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी वाहन चालकाकडून / मालकाकडून शासकीय शुल्काव्यतिरिक्त रुपये ३००/- रक्कम खाजगी इसम श्री. सुनिल भोईर यांचेमार्फत लाच स्वीकारताना पंच साक्षीदारासमोर लोकसेवक श्री.निळोबा तांदळे व खाजगी इसम श्री.सुनिल भोईर यांना रंगेहात पकडण्यात आले. याबाबत श्री. निळोबा तांदळे तसेच श्री. सुनिल भोईर यांच्या विरुध्द तलासरी पोलीस स्टेशन, जिल्हा पालघर येथे रजि.नं.२२०/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७(अ), १२ अन्वये दि.०४.०९.२०२३, रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना दि.०५.०९.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. सध्या आरोपी जामीनावर मुक्त आहेत.

दि.०८.११.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. निळोबा तांदळे, मोटार वाहन निरिक्षक यांना अटकेच्या दिनांकापासून म्हणजेच दि.०५.०९.२०२३ पासून शासकीय सेवेतून मानीव निलंबित करण्यात आले होते. तसेच श्री निळोबा तांदळे, मोटार वाहन निरीक्षक (निलंबित) यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

*****

गृह विभाग	लक्षवेधी सूचना क्रमांक ६९

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

**श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनिल देशमुख, श्री. रोहित पवार, श्री. चेतन तुपे, श्री. पृथ्वीराज चव्हाण, श्री. विश्वजित कदम, श्री. बाळासाहेब थोरात, कुमारी प्रणिती शिंदे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अशोकराव चव्हाण. श्री. ऋतुराज पाटील, श्री. संग्राम थोपटे, श्री. अमित विलासराव देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. महेश (दादा) किसन लांडगे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६९ पुढीलप्रमाणे आहे :-**

"दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी सातारा जिल्ह्यातील पुसेसावळी गावात समाजमाध्यमांवर प्रसिध्द झालेल्या आक्षेपार्ह मॅसेजवरुन जमावा-जमावामध्ये दंगल उसळुन त्या दुर्घटनेत एकाचा दुर्देवी मृत्यू तर १५ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, सदर दंगलीमध्ये जमावाने फरशी, दांडकी, दगडगोटे वापरल्याचे व जाळपोळ करुन तेथील वाहनांची तोडफोड व हातगाड्याची मोडतोड केली असल्याचेही त्यासुमारास निदर्शनास आले असणे, त्यामुळे सदर दंगलीदरम्यान पोलिसांना संचारबंदी लागू करावी लागणे, तसेच खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ पोलिसांना जिल्ह्यातील इंटरनेट सेवा बंद ठेवावी लागण्याची पोलिसांवर आलेली पाळी, सदर दंगलीमागचे नेमके कारण काय आहे व त्यात पोलिसांनी किती आरोपींना अटक करुन कोणते गुन्हे दाखल केले आहेत, याबाबत अद्याप अवगत न होणे, त्यामुळे निर्माण झालेली संभ्रमावस्था, त्यामुळे या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, परिणामी तेथील जनतेमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, सदर दंगलीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाच्या कुटूंबियांना शासनाकडून आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही करण्याची गरज व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

सातारा जिल्ह्यातील पुसेसावळी गावात दिनांक १०/०९/२०२३ रोजी 'mujju-bagwan-७' या इन्स्टाग्राम आयडीवरुन आरोपी याच्या 'al.tamash2069' इन्स्टाग्रामच्या अकाऊंटवर महापुरुषाबद्दल आक्षेपार्ह मजकुर प्रसारीत झाल्यामुळे औंध पोलीस ठाणे गु.र.क्र. २५४/२०२३ भादंवि कलम २९५ (अ), १५३(अ), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयामध्ये एकुण २ आरोपींना फौ.प्र.सं १९७३ मधील कलम ४१ (अ) प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे. सदरची आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित झाल्यामुळे पुसेसावळी गावामध्ये संतप्त जमावाने मुस्लिम समाजाचे मशिदीवर दगडफेक तसेच वाहनांची जाळपोळ केली. मशिदीतील लोकांना केलेल्या मारहाणीमध्ये एका युवकाचा मृत्यू झाला व १० जण गंभीर जखमी झाले ही वस्तुस्थिती आहे. सदर प्रकरणी औंध पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २५५/२०२३ भादंवि कलम ३०२, ३०७, ३२४, १४१, १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ४३५, ४४९, ४५०, १२० (ब), १५३, २९५, २९५ (अ), २९६, २९७, २९८ सह सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनीयम १९८४ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयामध्ये ३५ आरोपी निष्पन्न झाले असून २१ आरोपींवर अटकेची कारवाई करण्यात आलेली आहे. गुन्हयाचे तपासामध्ये लाकडी दांड़के, दगडगोटे, इ. वापरल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत घटनेच्या अनुषंगाने अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेऊन पोलीसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. तसेच, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सी.आर.पी.सी. कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश व खबरदारीचा उपाय म्हणून काही काळ तणावाच्या कालावधीत इंटरनेट सेवा खंडीत ठेवणे, लोकांना सलोखा व शांतता राखण्याचे आवाहन करणे, आवश्यक तो बंदोबस्त ठेवणे व इतर खबरदारीच्या उपाययोजना पोलीस घटकांमार्फत करण्यात आल्यात. केंद्रशासनाने दि. २९/६/२०१२ रोजी Central scheme for assistance to civilians victims of communal या योजनेच्या अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेच्या अंतर्गत पुसेसावळी घटनेतील बळी पडलेल्या मृताचे वारसांना तसेच जखमींना मदत देण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.

*******************

लक्षवेधी सुचना क्र.२१४३

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तिसरे हिवाळी अधिवेशन

**श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१४३ पुढील प्रमाणे आहे-**

"ठाणे जिल्हयातील जेष्ठ नागरीक व महिला यांची फसवणुक करुन त्यांची जमिन व पैसा हडपल्याने त्यांच्या सुरक्षेला मोठा धोका पोहोचलेला असल्यामुळे त्यासंदर्भात वेळोवेळी जेष्ठ नागरीक पुरुषोत्तम महिजीभाई पटेल व ईतर नागरीकांनी अप्पर पोलिस महासंचालक नागरी हक्क संरक्षण मुंबई व पोलिस अधिक्षक नागरी हक्क संरक्षण नवी मुंबई यांच्याकडे दि.२८/०६/२०२३ रोजी रीतसर तक्रार देऊनही त्याबाबत संबंधीत जेष्ठ नागरीक व महिलांना तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीच कारवाई संबधित अधिकाऱ्यांनी केली नसणे, ठाणे पोलिस आयुक्तालय, मीरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय व पोलिस अधिक्षक ठाणे यांच्याकडे कित्येक वर्षापासून तक्रारी प्रलंबित असणे व त्याची दखल गैरव्यवहारामुळे पोलिस अधिकारी घेत नसल्यामुळे संबंधित जेष्ठ नागरीक व महिलांनी नागरी हक्क संरक्षण यांच्याकडे न्याय मागणे,विधवा महिला व जेष्ठ नागरीक यांच्या मिळकतीचे खोटे कागदपत्र बनवण्यात आल्याने सुध्दा पोलिस अधिकाऱ्यांकडुन कोणत्यायच प्रकारची दखल घेतली नसणे, त्यामुळे त्यांरच्याबमध्यो नाराजी पसरलेली असणे, सदर जेष्ठ नागरीक व दुर्बल महिला यांची फसवणुक करुन त्यांची जमिन व पैसा हडपल्याने त्यांच्या सुरक्षेला मोठा धोका पोहोचविणा-यावर कठोर शासन करण्याचची आवश्यहकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

श्री. पुरुषोत्तम महिजीभाई पटेल यांनी अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस अधिक्षक, नागरी हक्क संरक्षण, नवी मुंबई यांचेकडे दिनांक २८.०६.२०२३ रोजी दिलेल्या तक्रार अर्ज पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-२, भिवंडी कार्यालयात दिनांक २६.०७.२०२३ रोजी प्राप्त झालेला असून सदर अर्जातील नमूद नागरीकांच्या तक्रारींची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

१) श्री. पुरुषोत्तम महिजीभाई पटेल यांनी जेष्ठ नागरीकांची फसवणूक करुन त्यांची जमिन पैसा हडपलेबाबत व त्यांचे सुरक्षेला धोका असल्याबाबत अर्जाची चौकशी नारपोली पोलीस

ठाणे यांनी केली असून अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेली बाब दिवाणी स्वरुपाची असल्याने चौकशी अंती तसे समजपत्र देऊन अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला आहे.

२) श्रीमती कनकीबाई हेंद्रर म्हात्रे यांनी जमीन मिळकतीबाबत केलेला अर्ज दिनांक ३०.०४.२०२३ रोजी नारपोली पोलीस ठाणे येथे प्राप्त झाला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने सी.आर.पी.सी.१४९ प्रमाणे एकास शांतता भंग न करण्याची नोटीस देण्यात आली आहे. सदर प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने तसेच दिवाणी स्वरुपाचे असल्याने सदर अर्ज हा दप्तरी फाईल करण्यात आला आहे.

३) श्रीमती कनिषा भालचंद्र म्हात्रे यांनी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने मा. न्यायालयीन आदेशान्वये नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे गु.र.नं.८०/२००९, भा.द.वि.कलम ४२०, ४१९, ४२५, ४६१, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मा. न्यायालयात आरोपींताविरुध्द दोषारोपपत्र सादर केले असून मा. न्यायालयात सदर केस दिनांक २६.०४.२०१३ रोजी निकाली काढण्यात आलेली आहे.

४) श्रीमती लक्ष्मी मारुती टावरे यांचे तक्रार अर्जाबाबत त्यांनी मा. उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे कोर्टात आर.टी.एस. अपील क्रमांक २४७/२०१९ दाखल केलेले असून अपील सुनावणी प्रलंबित आहे. सदरचा अर्ज दिवाणी व महसूल विभागाशी संबंधित असल्याने त्यांची दोन्ही तक्रार अर्ज दि.२९.६.२०२२ व दि.२४.०४.२०२३ रोजी तहसिलदार, ता. भिवंडी यांचेकडे पाठविण्यात आलेले आहेत.

५) श्री. रामू नागो भोईर यांनी केलेला तक्रार अर्ज यामध्ये शिवाजी चौक, भिवंडी येथील ३२ वर्षापूर्वी अधिकृत गाळे, नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी नोटीस न देता विकासकाच्या फायद्याकरिता अधिकृत ३४ गाळे तोडून टाकलेबाबत आहे. सदर बाब भिंवडी महानगरपालिका या विभागाशी संबंधित असल्याने आयुक्त, भिंवडी महानगर पालिका, भिवंडी यांना दि.०४.०२.२०२२ रोजी पुढील कार्यवाही करीता वर्ग करण्यात आला आहे.

श्री. पुरुषोत्तम महिजीभाई पटेल यांनी अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस अधिक्षक, नागरी हक्क संरक्षण, नवी मुंबई यांचेकडे दिनांक २६.०६.२०२३ रोजी दिलेला तक्रार अर्ज दि.२६.०७.२०२३ रोजी नारपोली पोलीस ठाणे, भिंवडी येथे पाठविण्यात आला. सदर अर्जात अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील वाद असलेल्या मिळकतीबाबत मा. दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबित असून जागेबाबत न्यायालयाने Status Quo चे आदेश दिलेले आहेत.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील जेष्ठ नागरीक व महिला यांच्या फसवणूकीबाबत खालील प्रमाणे तक्रारी प्राप्त असून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | आरोपी संख्या | अटक आरोपी | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| २०२३ | ३४ | १८ | ४७ | २२ | कोर्टात प्रलंबित -०८<br>पोलीस तपास-२५<br>क.फायनल-०१ |

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील विधवा व जेष्ठ नागरीक यांचे मिळकतीचे खोटे कागदपत्रा-बाबत खालीलप्रमाणे तक्रारी प्राप्त असून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| सन | अर्ज | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | आरोपी संख्या | अटक आरोपी | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२३ | १६ | ०८ | ०५ | २० | ०८ | पोलीस तपास-०८<br>अर्ज फाईल-१५ |

पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांचे क्षेत्रात जेष्ठ नागरिक व महिला यांची फसवणूक केलेबाबत खालीलप्रमाणे तक्रारी प्राप्त असून गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ०७ | ०५ | ०३ | कोर्टात प्रलंबित -०२<br>पोलीसं तपास-०४<br>अ.फायनल-०१ |

पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांचे क्षेत्रात विधवा महिला व जेष्ठ नागरीक यांच्या मिळकतीचे खोटे कागदपत्र बनविण्यात आल्याबाबत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ०४ | ०४ | ०४ | कोर्टात प्रलंबित -०२<br>पोलीस तपास-०२ |

मिरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालय क्षेत्रात जेष्ठ नागररिक व महिला यांची फसवणूक केल्याबाबत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | आरोपी संख्या | अटक आरोपी | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| २०२३ | २४ | १८ | ४१ | १५ | कोर्टात प्रलंबित-०५<br>पोलीस तपास-१३<br>अ.फायनल-०६ |

मिरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालय क्षेत्रात विधवा महिला व जेष्ठ नागरीक यांच्या मिळकतीचे खोटे कागदपत्र बनविण्यात आल्याबाबत प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | आरोपी संख्या | अटक आरोपी | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| २०२३ | ०६ | ०६ | १० | ०४ | कोर्टात प्रलंबित-०२<br>पोलीस तपास-०४ |

पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई क्षेत्रात जेष्ठ नागरीक व महिला यांची फसवणुक करुन त्यांची जमिन व पैसा हडपल्याने त्यांच्या सुरक्षेला मोठा धोका पोहोचलेला असल्यामुळे त्यासंदर्भात २०२३ मध्ये तक्रार/अर्ज प्राप्त किंवा गुन्हे दाखल करण्यात आला नाही.

महिलांच्या संदर्भातील गंभीर गुन्ह्यांबाबत तक्रारी या महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाद्वारे हाताळण्यात येतात. राज्यातील सर्व पोलीस स्टेशन स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

अनुसूचित जाती, जमाती, जेष्ठ नागरिक, विधवा महिला व इतर दुर्बल महिला यांच्या तक्रारीची तात्काळ नोंद घेण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण विभाग यांचेमार्फत नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ तसेच अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९८९ कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यात येते. अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये याकरिता वेळोवेळी कार्यशाळा, बैठका, आढावा बैठका आयोजित करण्यात येतात. तसेच विभागाद्वारे अट्रॉसिटीसंबंधित गुन्हा दाखल झालेल्या ठिकाणी भेट देण्यात येते तसेच सदर गुन्ह्यातील फिर्यादी / पिडीत यांना त्यांच्या अधिकाराबाबत, शासकीय मदतीबाबत माहिती दिली जाते.

---

लक्षवेधी सूचना क्र.2079

महाराष्ट्र विधानसभा

सन 2023 चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

( श्री.राहुल कुल व श्री. जयकुमार गोरे, सर्व विधानसभा सदस्य )

"राज्यात चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढणे, IRD माध्यमातून सदर जमिनीच्या निर्मुलन कार्यक्रम आखणे, दौंड तालुक्यातील उक्त शेतजमिनीचे सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी करणे, सुधारित धोरण राबविण्याबाबत व नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत कार्यवाही होत नसणे तसेच पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्प ते लोणी काळभोरपर्यंत बंदनळी कालव्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने कालव्याच्या पाण्याची नासाडी होणे, यासाठी २००० कोटीचा खर्च अपेक्षित असणे याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित असणे, खडकवासला कालवा, चाऱ्याची दुरवस्था झालेली असणे, दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर असणे, जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने परिसरातील ४० हून अधिक गावांना दुष्काळाचा सामना करावा लागणे, या योजनेचा 858.08 कोटीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रलंबित असणे, वॉल्व, विमोचक, जोडणी आहेत त्याठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण मोठे असल्यामुळे पाण्याची गळती होणे, उक्त प्रकल्पास आशियन बँकेच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन प्रकल्पासाठी निधी देण्याची तयारी दाखविणे, कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास गट गठीत करण्यात आलेला असणे, सुर्वे समितीचा अहवाल प्रलंबित असणे याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपयोजना"

---

मा.उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

मोठ्या व मध्यम प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात उद्भवणाऱ्या पाणथळ व क्षारयुक्त जमीनींच्या समस्या सोडविण्यासाठी व खराबा क्षेत्राच्या सुधारणासाठी जलनिस्सारण चर योजना तयार करुन कार्यान्वित करणेकरीता जलसंपदा विभागाच्या अख्यातरीत सन १९६९ पासून "पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय" हे कार्यालय कार्यान्वित आहे. सतत 3 वर्षे एका जागी किमान 4 हेक्टर क्षेत्र पाणथळ व क्षारपड निश्चित झाल्यास सर्व्हेक्षण व संकल्पन करून खुल्या चर योजना प्रस्तावित केल्या जातात. आज अखेरपर्यंत महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांचे लाभक्षेत्रामध्ये एकूण 903 चर योजना बांधकामे पुर्ण करण्यात आली आहेत. यामुळे 51410 हेक्टर क्षेत्र संरक्षित झाले आहे.

नवीन मुठा उजव्या कालव्याच्या लाभक्षेत्रात एकुण 95 उघड्या चर योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत. या पैकी दौंड तालुक्यातील 82 पुर्ण झालेल्या चर योजना आहेत. सन 2021-22 चे अहवालानुसार दौंड तालुक्यातील क्षेत्र पाणथळ क्षेत्र 896.00 हेक्टर व क्षारपड क्षेत्र 2354.35 हेक्टर असे एकूण 3250.35 हेक्टर एवढे आहे. यामध्ये दौंड तालुक्यातील 14 चर योजनांचे सर्वेक्षण सन 2012-13 व 2017-18 मध्ये पुर्ण झाले आहे.

मा. विधानसभा सदस्य श्री. राहुल कुल दौंड (जि. पुणे) यांनी त्यांचे पत्र क्र. दौंड विसस/मुंबई/182/2022 दि. 31/10/2022 अन्वये मा. उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दौंड

तालुक्यातील चिबड, पाणथळ व क्षारयुक्त जमिनींचे प्रमाण वाढले असुन सदर जमिनींचे सर्वेक्षण करुन प्रस्ताव सादर करण्याची मागणी केली होती.

प्रचलित चर योजनांचे मापदंड शासन निर्णय, दिनांक २०.९.१९९१ प्रमाणे मध्यम मातीतील चरांसाठी रु.३१०० प्रति हेक्टर व खोल मातीतील चरांसाठी रु.४००० प्रति हेक्टर इतके आहेत. हा मापदंड अद्यावत झाला नसल्याने नविन प्रस्तावित योजना या मापदंडात बसत नाहीत. त्यामुळे चर योजनांचे मापदंड सुधारीत करण्याची कार्यवाही शासनस्तरावरून प्रगतीत आहे. चर योजनांचे सुधारीत आर्थिक मापदंड मंजूर झालेनंतर सर्व्हेक्षण पुर्ण योजनांची अंदाजपत्रक मंजूरी व बांधकामे हाती घेणे शक्य होईल.

पुणे जिल्ह्यातील खडकवासला प्रकल्पातंर्गत 202 कि.मी. लांबीच्या नवीन मुठा उजवा कालव्यापैकी कि.मी. 1 ते 34 मधील कालवा रद्द करुन त्याऐवजी खडकवासला जलाशयामधून नवीन मुठा कालव्यास फुरसुंगीजवळ 34 व्या कि.मी. मध्ये जोडणारा 23.50 कि.मी. लांबीचा भुयारी मार्ग (बोगदा) करणे प्रस्तावित आहे. सदर कामाची सन 2022-23 च्या दरसूचीनुसार येणारी किंमत रु.2287 कोटी इतकी आहे. या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

खडकवासला संयुक्त प्रणालीतील वितरिकांची कामे विशेष दुरुस्ती अंतर्गत क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहेत. खडकवासला संयुक्त प्रणालीतील कालव्यांची दुरुस्तींची कामे बिगर सिंचन व सिंचन प्रापणसूची व सिंचन पुनर्स्थापना निधीमधून करण्यात येत आहेत. विशेष दुरूस्ती/विस्तार सुधारणा अंतर्गत जुना मुठा उजवा कालव्यास अस्तरीकरण करणे व त्यावरील बांधकामे दुरुस्ती करणेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. नवीन मुठा उजवा कालव्याच्या भराव दुरूस्ती, बांधकामे दुरूस्ती व अस्तरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

खडकवासला प्रकल्प जलनियोजनानुसार जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी एकूण 3.60 टी.एम.सी. पाणी वापर मंजूर आहे. परंतू, पुणे शहराचा प्रत्यक्ष पाणी वापर हा मंजूर पाणी आरक्षणापेक्षा जास्त असल्याने जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेला प्रकल्प तरतूदीनुसार पाणी उपलब्ध होत नाही. तथापी खडकवासला धरणस्थळी जनाई-शिरसाई उसियो साठी खरीप हंगाम 2023-24 मध्ये 1.66 टिएमसी पाणी देण्यात आलेले आहे. तसेच उपलब्ध होणारे पाणी समन्यायी तत्वावर सर्व गावांना देण्यात येते.

जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचा रू.858.09 कोटी किंमतीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. प्रकल्पाच्या कालव्याची कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे सदर प्रकल्प बांधकामाधीन प्रकल्पाच्या यादीतून वगळणेत आला आहे. सदर प्रकल्पाची उर्वरित कामे विस्तार सुधारणा अंतर्गत करण्यासाठी रू.344.97 कोटी किंमतीचा प्रस्ताव दि.11/12/2023 रोजीच्या पत्रान्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस सादर झाला आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या अधिकाऱ्यांनी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेस भेट दिली आहे.

पुरंदर उपसा सिंचन योजनेद्वारे पुणे जिल्ह्यातील 4 तालुक्यातील 63 गावातील 25,498 हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे प्रस्तावित असून सद्यस्थितीत सदर योजनेची मुख्य कामे पूर्ण झाली असून योजना सन 2006 पासून कार्यान्वित आहे. या प्रकल्पांतगंत 24,998 हे. क्षेत्रावर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून मागील 3 वर्षातील सरासरी सिंचन 16,700 हे. झालेले आहे. या योजनेची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी सुमारे रु.14 कोटीची आवश्यकता आहे. त्यासाठी अवशिष्ट निधीमधून सन 2023-24 मध्ये रु.7 कोटींची तरतूद आहे. त्यातुन आतापर्यंत 0.19 कोटी खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पाच्या रू.460.95 कोटी किंमतीच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास शासनाने दिनांक 31.01.2023 रोजी मान्यता दिली असून प्रकल्पाची उर्वरीत कामे जलसंपदा विभागाच्या अर्थसंकल्पिय तरतूदी मधून मार्च 2025 पर्यंत

पूर्ण करण्याचे नियोजन आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या अधिकाऱ्यांनी पुरंदर उपसा सिंचन योजनेस भेट दिलेली नाही.

कोयना जलविद्युत प्रकल्पाद्वारे 67.50 टीएमसी व टाटा कंपनीच्या 6 जलविद्युत प्रकल्पांद्वारे सरासरी 42.50 टीएमसी पाणी पश्चिमेकडे वळवून विद्युत निर्मिती करण्यात येत आहे.

राज्य जलनितीनुसार पिण्याचे पाणी व सिंचनाबाबत पाणी वापराचा प्राधान्यक्रम जलविद्युतच्या वर असल्याने तसेच विविध पर्यायाव्दारे वीज उपलब्ध करणे शक्य असल्याने कृष्णा खोऱ्यातील पाण्याची वाढती मागणी विचारात घेता पश्चिमेकडे वळविण्यात येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी दि. 2 ऑगस्ट, 2018 चे शासन निर्णयान्वये भावे समिती गठित करण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास दि. 10.5.2019 रोजी प्राप्त झाला आहे.

उपरोक्त भावे समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने शासनास पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यासाठी श्री. अविनाश सुर्वे, निवृत्त सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि. 1.12.2020 रोजी झालेल्या बैठकीत कृष्णा पाणी तंटा लवाद संदर्भात इतर राज्याची मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विविध याचिकेवर सुनावणी प्रगतीत असुन यावर अंतिम निर्णय अपेक्षित आहे. त्यापूर्वी समितीने अहवाल दिल्यास त्याचा विपरीत परिणाम उपरोक्त सुनावणीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे न्यायालयाचा अंतिम निकाल होईपर्यंत समितीने अभ्यास पूर्ण करावा व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर समितीचा अहवाल जाहीर करावा असा निर्णय घेण्यात आला.

तदनंतर, सदर गठित समितीच्या दि. 02 जून, 2022 व दि. 03 जून, 2022 रोजी संपन्न झालेल्या बैठकीत तज्ञ समितीच्या निर्णयानुसार अहवाल अंतिम करण्यात आला आहे. तथापि, सध्या व्दितीय कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निवाडयांबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विविध विशेष अनुमती याचिका विचारात घेता उक्त सर्व न्यायालयीन प्रकरणे अंतिमत: निकाली निघाल्यावर व व्दितीय कृष्णा पाणी तंटा लवादाचा निवाडा केंद्र शासनाकडून अधिसूचित झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी अधिकृत स्वरूपात निर्णय घेणे उचित ठरेल.

***********************************************************************************

लक्षवेधी सूचना क्र. ७२०

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्री. संजय गायकवाड, श्री. मोहनराव हंबर्डे, श्रीमती जयश्री जाधव, श्री. राजु आवळे, श्री. ऋतुराज पाटील, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७२० पुढीलप्रमाणे आहे:-**

" महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ ते महावितरण कंपनीपर्यंतचा कार्यकाल पाहता जे तळागाळात कार्यरत असणाऱ्या लाईनस्टाफ कर्मचारी यांच्या ज्वलंत प्रश्नासंदर्भात प्रशासनस्तरावर मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व मा. संचालक मानव संसाधन स्तरावर दोन बैठका होऊनही लेखी स्वरुपात कोणताही ठोस निर्णय न झाल्याने महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समिती यांनी हिवाळी अधिवेशन २०२३ दरम्यान आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील लाईन स्टाफच्या विविध मागण्यांसंदर्भात महाराष्ट्र वीज लाईनस्टाफ बचाव कृती समितीने दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांच्या स्तरावर दि. १७.११.२०२३ रोजी बैठक झाली तसेच संचालक (मासं), महावितरण यांच्या स्तरावर दि.१४.१२.२०२३ रोजी नागपूर येथे बैठक झाली. तसेच मा. संचालक (मासं), महावितरण यांच्या स्तरावर दि. २०.०१.२०२४ रोजी संघटनेसमवेत सकारात्मक चर्चा करण्यात येऊन बैठका संपन्न झालेल्या असून सदर बैठकांचे लेखी इतिवृत्त संघटनेस वेळोवेळी देण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्य वीज लाईनस्टाफ बचाव कृती समिती यांनी उपस्थित केलेल्या मागण्यां मधील लाईनमन कर्मचारी यांचे कामाचे तास, कामाचे स्वरूप व रात्रपाळी भत्ता निश्चित करण्याच्या मागण्यांसदर्भात महावितरणद्वारा कर्मचाऱ्यांचे कामाचे तास निश्चित करण्यात आलेले असून, कामाच्या स्वरुपाच्या बाबतीत कृती आराखडा तयार करण्यात आलेला असून, याबाबत संघटने समवेत चर्चा सुरू आहे. रात्रपाळी भत्ता महावितरणच्या सामान्य आदेश क्र. १२२ (P) दि. २२.०३.१९९० नुसार अदा करण्यात येत आहे.

तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांना सुधारीत वाहतूक भत्ता दि. ०१.०१.२०२० पासून मंजूर करण्यात आलेला आहे. याबाबत प्रशासकीय परिपत्रक क्र. ६६४, दि. २१.१२.२०२३ रोजी प्रसारीत करण्यात आलेले आहे.

महावितरण कंपनीतील लाईनस्टाफ कर्मचा-यांना स्वतंत्र वेतनश्रेणीच्या व वर्ग ४ मधील शैक्षणिक अर्हता प्राप्त लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांना वर्ग ३ मध्ये वर्गीकरण करण्याबाबतची मागणी वेतन पुर्ननिर्धारणाशी संबंधित असल्यामुळे याबाबत स्वतंत्रपणे चर्चा नियोजित आहे.

सुरक्षा साधने व लाईन मेन्टेनन्स करीता साहीत्य पुरविण्याच्या मागणीबाबत मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा), एकलहरे, नाशिक यांच्या सुचनांनुसार कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधीत विभाग व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आलेले आहेत.

वीज देयके व महसुल विभागामार्फत वीज देयक वसुली सांघिक स्वरूपात करण्यासंदर्भात परिपत्रक क्र.३२१७ दि.३०.०१.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

*******************

रोटा/एच-००६९[८००-०६-२०२४].

**लक्षवेधी सूचना क्र. २३३५**

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे तृतीय अधिवेशन

**श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३३५ पुढीलप्रमाणे आहे :-**

""सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्याची भौगोलिक रचना सध्याचे ग्राहक संख्या व प्रलंबित ग्राहकांची संख्या या तालुक्यात मोठ्या संख्येत असल्याने उपकेंद्र व फीडर लक्षात घेता अक्कलकोट येथे महावितरणचे अतिरिक्त नवीन उपविभागीय कार्यालयाची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे असून तसा प्रस्ताव महावितरणच्या मुख्य कार्यालयास सादर करण्यात आला आहे त्यास तातडीने मंजुरी मिळावी अशी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिकांची मागणी असणे, तसेच RDSS योजनेअंतर्गत अक्कलकोट विधानसभा क्षेत्रात अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर, वितरण रोहित्रे, नवीन ३३ k.v. उपकेंद्रे प्रस्तावित केली असून यामध्ये किणी, अक्कलकोट शहर, भुरीकवठे येथे अतिरिक्त पावर ट्रान्सफर व बोरोटी (बुद्रुक), कर्जाल धोत्री (दोड्डी), गंगेवाडी येथे नवीन ३३ k.v. उपकेंद्र प्रस्तावित असून सदर कामे तात्काळ मंजूर करून कामे सुरू करण्याची येथील शेतकऱ्यांची मागणी असणे, अक्कलकोट तालुका हा दुष्काळी तालुका म्हणून गणला जात असल्याने या तालुक्यात अनेक विजेच्या समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याने येथील समस्या कायमस्वरूपी सोडवणे गरजेचे असणे, त्यामुळे अक्कलकोट येथे महावितरण कंपनीचे नवीन उपविभागीय कार्यालय मंजूर करून अक्कलकोट तालुक्याला शासनाने न्याय देण्याची जनतेतून मागणी होत असणे, यावर याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

याबाबत सादर करण्यात येते की, बारामती परिमंडळातील सोलापूर मंडळांतर्गत सोलापूर ग्रामीण भागातील अक्कलकोट उपविभागाची सध्याची ग्राहक संख्या ६६६४३ इतकी आहे.

अक्कलकोट उपविभागीय विभाजनपूर्वीची व विभाजननंतरची स्थिती.

| अ.क्र | अक्कलकोट उपविभागाची विभाजनपूर्वीची स्थिती. | | | अक्कलकोट उपविभागाची विभाजननंतरची स्थिती. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उपविभागाचे नाव | शाखा कार्यालयाचे नाव | ग्राहक संख्या | उपविभागाचे नाव | शाखा कार्यालयाचे नाव | ग्राहक संख्या |
| २ | अक्कलकोट | अक्कलकोट ग्रामीण | ४५३५ | अक्कलकोट उपविभाग-१ | अक्कलकोट ग्रामीण | ४५३५ |
| ३ | | अक्कलकोट शहर | ११७४७ | | अक्कलकोट शहर | ११७४७ |
| ४ | | दुधनी | ६२४७ | | हुन्नर | ७८७५ |
| ५ | | हुन्नर | ७८७५ | | वागदरी | ८४११ |
| ६ | | करजगी | ६४२० | | एकूण | ३२५६८ |
| ७ | | मेदंगी | ९२५६ | अक्कलकोट उपविभाग-२ | मेदंगी | ९२५६ |
| ८ | | नागणसूर | ५३४३ | | दुधनी | ६२४७ |
| ९ | | तडवळ | ९८०९ | | नागणसूर | ५३४३ |
| | | वागदरी | ८४११ | | करजगी | ६४२० |
| | | - | - | | तडवळ | ६८०९ |
| | | - | - | | एकूण | ३४०७५ |
| | | एकूण | ६६६४३ | एकूण | | ६६६४३ |

महावितरण कंपनीच्या एम.पी.आर. आदेशानुसार दि. ०४/१/२०१० नुसार ग्रामीण उपविभागीय कार्यालय विभाजनाकरीता ६०,००० इतकी बीज ग्राहक संख्या आवश्यक आहे व नवीन उपविभागीय कार्यालय निर्मितीकरीता ३०,००० इतकी वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणी कंपनीच्या ग्राहक मानकानुसार तसेच कंपनीची आर्थिक परिस्थिती व आर्थिक दायित्व तसेच मिळणारा महसूल याची योग्य ती सांगड घालून नवीन उपविभाग अथवा कार्यालय निर्मितीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

तसेच RDSS योजने अंतर्गत सोलापूर जिल्हयामध्ये एकूण रु.३५३६ कोटीची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

RDSS योजने अंतर्गत प्रस्तावित कामे :

सोलापूर जिल्हा: (एकूण रक्कम रु.३,५३६ कोटी)

**अ. वितरण हानी कमी करणे (एकूण रक्कम रु.४५९ कोटी)**

| | | |
|---|---|---|
| वाहिनी पृथक्करण (Feeder Segregation) | | २०१ वाहिन्या |
| वाहिनी विभाजन (Feeder Bifurcation) | | ३९५ किमी |
| वाहिनी क्षमतावाढ | | ५८९ किमी |
| वीजचोरी प्रवण क्षेत्रात Aerial Bunched (AB) केबलचा वापर | | १७०५ किमी |
| उपकेंद्रांना कॅपेसिटर बसविणे | | १२४ नग |

**आ. वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकिकरण** (एकूण रक्कम रु.२,६३३ कोटी)

| | | |
|---|---|---|
| नवीन उपकेंद्र | -- | ६९ उपकेंद्रे |
| उपकेंद्र अतिरिक्त रोहित्र | -- | ९० नग |
| उपकेंद्र रोहित्र क्षमतावाढ | -- | २१ नग |
| नवीन उच्चदाब वाहिनी | -- | ५१९५ किमी |
| नवीन लघुदाब वाहिनी | -- | २३४६ किमी |
| नवीन वितरण रोहित्रे | -- | ५४४७ रोहित्रे |
| वितरण रोहित्रांची क्षमतावाढ | -- | २०९८ रोहित्रे |

इ. स्मार्ट मीटरिंग (एकूण रक्कम रु.४४४ कोटी)

RDSS योजनेमध्ये अक्कलकोट मतदार संघामध्ये कर्जाल, धोत्री (दोड्डी) व गंगेवाडी येथे २ x ५ MVA क्षमतेची नवीन उपकेंद्रे, किणी, अक्कलकोट शहर, भरीकवठे, गुड्डेवाडी व मिरजगी या उपकेंद्रांमध्ये ५ MVA क्षमतेची अतिरिक्त रोहित्रे, व अक्कलकोट शहर, मैन्दर्गी येथे उपकेंद्र रोहित्रांची क्षमतावाढ (५ MVA ते MVA) प्रस्तावित आहे.

योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार नवीन उपकेंद्रे, उपकेंद्रांची क्षमतावाढ, नवीन रोहित्रे हि कामे "वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण" यामध्ये अंतर्भूत आहेत. या कामांना केंद्र शासनाकडून मंजूरी पुढील वर्षी प्राप्त होणे अपेक्षित आहे. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदरील कामे करण्यात येतील.

कृषी आकस्मित निधी अंतर्गत बोरोटी (बुद्रुक) येथे नवीन उपकेंद्राची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे व कुडल, मोटयाळ या उपकेंद्रामध्ये अतिरिक्त रोहित्र प्रस्तावित करण्यात आली आहेत.

********************************

वैद्यकीय शिक्षण विभाग

९७७

लक्षवेधी सूचना क्र.- २०४७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्री. नितीन पवार, श्री. दिलीपराव बनकर, श्रीमती देवयानी फरांदे, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०४७ :-**

"महाराष्ट्र वैद्यकीय परिषद मुंबई येथे सरळ सेवा भरती अंतर्गत भरती प्रक्रिया करताना मोठ्या प्रमाणावर अनियमितता करण्यात येणे, सरळ सेवा भरती करताना तसेच पदोन्नती करताना शैक्षणिक अर्हता , किमान अनुभव, पात्रता व वयोमर्यादा या मूलभूत पात्रतांचा विचार न करता भरती प्रक्रिया करण्यात येत असणे, याबाबत डॉक्टर संजय सुरासे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रँड शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करून चौकशी करण्यात येणे, या चौकशीत बारावी पास असणारी व्यक्ती टंकलेखनाची आवश्यक पात्रता पूर्ण न करता व संगणक हाताळण्याचे एम एस सी आय टी प्रशिक्षण पूर्ण न झालेल्या व्यक्तीची निवड करण्यात येणे, याबाबत वृत्तपत्रातून कोणतीही आवश्यक जाहिरात न करता भरती प्रक्रिया करण्यात येणे आदी अनिमितता झाल्याचे स्पष्ट होणे, याबाबतचीअनिमितता दूर करण्यासाठी संबंधितांवर सुयोग्य कारवाई करण्याची शिफारस समितीने केकेली असणे, असे असताना देखील याबाबत कोणतीही ठोस कारवाई करण्यात न येणे, अनियमितता करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना संरक्षण देण्याची भूमिका प्रशासनाने घेतली असणे, त्यामुळे भविष्यात देखील अशाच प्रकाराने अनियमितता होण्याचा वाढलेला धोका, याबाबत शासनाने सक्तीने तात्काळ कारवाई करण्याची असणारी आवश्यकता, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन**

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची स्थापना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ नुसार झालेली आहे. सदर परिषदेचे कामकाज नमूद अधिनियम व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम, १९६७ मधील तरतुदीनुसार चालते. अधिनियमाच्या कलम १४ नुसार शासनाच्या पूर्वमंजूरीने परिषदेस प्रबंधकाची नेमणूकीची तरतूद आहे. तसेच अधिनियमातील कलम १५ नुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेस तिची कर्तव्ये व कामकाज पार पाडण्यासाठी प्रबंधकाव्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने प्रमुख लिपिक तथा रोखपाल पदावर पदोन्नतीने नियुक्त कर्मचाऱ्याची सरळसेवा भरती प्रक्रियेतील तथा पदोन्नती प्रक्रियेशी संबंधित चौकशी करण्याकरिता डॉ. संजय सुरासे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर जे. जे. समूह रुग्णालय, मुंबई यांची दि.१५.०५.२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. सरळ सेवा भरती प्रक्रियेतील तथा पदोन्नती प्रक्रियेत किमान अर्हता, किमान अनुभव, तांत्रिक पात्रता तसेच वयोमर्यादा इत्यादी निकष डावलून सदर कर्मचाऱ्यास नियुक्ती दिल्याचे व सदर सरळसेवा नियुक्ती आणि पदोन्नती नियमबाह्य असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, सदर प्रशासकीय अनियमितता दूर करण्यासाठी

संबंधितावर सुयोग्य कारवाई करण्याची शिफारस चौकशी अधिकारी यांनी केली आहे. त्या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्यास नैसर्गिक न्याय तत्वावर म्हणणे मांडण्याची संधी दि.१३.०६.२०२३ रोजीच्या परिषदेच्या पत्रान्वये देण्यात आलेली होती. त्यास अनुसरून संबंधित कर्मचाऱ्याने त्यांचे म्हणने परिषदेस दि.१९.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेले आहे. परिषदेच्या आस्थापनेवरील अनियमितता विचारात घेऊन, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नियम ८ अन्वये सेवेतून काढून टाकणे किंवा नियम ९ पोटकलम ४ अन्वये त्यांच्या शैक्षणिक अर्हतेस अनुरूप पदावनत करण्याबाबत झालेल्या परिषदेच्या निर्णयानुसार दि.०८.०८.२०२३ रोजीच्या परिषदेच्या आदेशान्वये सदर कर्मचाऱ्यास प्रमुख लिपिक तथा रोखपाल पदावरून शिपाई पदावर पदावनत केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधित कर्मचारी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्र. ३०९७२/२०२३ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

***********************************

सार्वजनिक आरोग्य विभाग

लक्षवेधी सूचना क्र. ६८०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. संजय जगताप, श्री. अशोकराव चव्हाण, श्री.बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संग्राम थोपटे, श्री. विकास ठाकरे, श्री. अस्लम शेख विधानसभा सदस्य यांनी

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

---

"सासवड (जि.पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात येथील शासकीय आरोग्य सेवेचे मुख्य रुग्णालय असणे, येथे आंतररुग्ण व बाह्यरुग्ण कक्षात मोठ्या संख्येने रुग्ण येत असणे, त्यामुळे एकीकडे जेजूरीच्या ग्रामीण रुग्णालयास चांगली इमारत व सुविधा देताना सासवडच्या ग्रामीण रुग्णालयाची क्षमता वाढीसाठी आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) सहसंचालक, यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव देणे, त्यास मान्यता मिळून ५ वर्षे उलटली असणे, परंतू या सर्व सुविधा कागदावरच असणे, वास्तविक येथे उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीसाठी अंदाजपत्रक व नकाशे तयार असून शासकीय महसूल यंत्रणेच्या अनास्थेपोटी कोरोना कालावधीचे कारणे देत श्रेणीवर्धन रखडले असणे, त्यामुळे शासनाने माहिती घेवून हे श्रेणीवर्धनाची प्रक्रिया तातडीने पार पाडावी अशी येथे मागणी होत असतानाही शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया..."

---

मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

ग्रामीण रुग्णालय, सासवड चे ३० खाटांवरुन ५० खाटांमध्ये विशेष बाब म्हणून श्रेणीवर्धन करण्यास शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२५२/आ-३अ, दिनांक १७.१०.२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुषंगाने उपसंचालक आरोग्य सेवा पुणे मंडळ, पुणे जा.क्रउसंआसे/नियोजन/कक्ष-६/ग्रारुसासवड/उपजिरजागा/१६८४-९०/१९ दिनांक २३.०१.२०१९६ व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय पुणे यांचे पत्र क्र. जिरुपु/नियोजन/ट्रॉमा केअर युनिट/सासवड/६३५६-६२ दिनांक १३.०४.२०१७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांना जुनी पंचायत समिती पुरंदर कार्यालयाची जागा ग्रामीण रुग्णालयासाठी देण्याविषयी जिल्हा परिषद सर्वसाधारण

सभेत ठराव मंजूर करणेबाबत वरीलप्रमाणे पत्र व्यवहार करण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय जागेची अदलाबदल करण्याच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी सासवड यांना दिनांक २४.०५.२०२२ रोजी आदेशित करण्यात आले आहे. ग्रामीण रुग्णालय, सासवड ता.पुरंदर जि. पुणे याचे पत्र क्र.ग्रारुस्था/आस्था/३९९/२३/दिनांक २९.०५.२०२३ व दिनांक ०३.०६.२०२४ अन्वये तहसीलदार तालुका पुरंदर यांना जागा हस्तांतरण करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आले आहेत. जागा हस्तांतरीत होताच ग्रामीण रुग्णालय, सासवड जि.पुणे चे ३० खाटांवरुन ५० खाटांचे अंदाजपत्रक प्राप्त करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

*****************************************************************

# महाराष्ट्र विधानसभा

२५७

**सन २०२३ चे हिवाळी अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र.२०६४**

श्री.समाधान अवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र २०६४ पुढीलप्रमाणे आहे :-

"झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्राधिकरणामध्ये प्रशासकीय भ्रष्टाचार होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये उघडकीय येणे प्राधिकरणपामध्ये पैसे देऊन क्रिम पोलिंग मिळविण्याचे प्रमाण दैनंदीन वाढत जाणे, एकाच जागेवर वर्षानुवर्ष असुनही बदली न होण्यामुळे प्राधिकरणात प्रशासकिय मुजोरी वाढत जाणे, उपमुख्य अभियंता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना माहे जानेवारी, २०१७ पासून बदली न करता एकाच पदावर आजतगत कायम ठेवून. शासनाच्या बदली धोरणचे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे होत असलेलले उल्लंघन, प्रतिनियुक्तीच्या नियमांना पायदळी तुडवून एकाच व्यक्तीला वर्षोनुवर्ष त्याच जागेवर ठेवल्याने दैनंदीन कामकाजात वाढत असलेली मक्तेदारी, तसेच सर्व सामान्याच्या कामकाजास बसलेली खीळ त्यामुळे हवालदील झालेली जनता, परिणामी सदर अधिकारी व त्यास संरक्षण देणाऱ्या यंत्रणेची सखोल चौकशी करण्याची व तात्काळ बदली करण्याची होत असलेली मागणी, याकडे शासनाने होत असलेली अक्षम्य दुर्लक्ष यावर शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही न शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ (अ) मधील तरतुदीस अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी सन १९९६ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारितील एक स्वतंत्र /स्वायत्त प्राधिकरण/संस्था आहे. ते शासकीय कार्यालय नाही. इतर प्राधिकरणाप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग नाही.

उक्त अधिनियमाच्या कलम ३ (I) येथे झोपडपट्टी पुनर्वसनाचे अधिकारी व कर्मचारी या शिर्षकाखालील क्र.(३) येथे अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या व सेवेच्या अटी विनियमांद्वारे वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील, अशा असतील, असे नमूद केले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात स्वतंत्र कर्मचारी वर्ग नाही, त्यामुळे त्यांच्या नियुक्तीच्या व सेवेच्या अटी निश्चित करण्यात आलेल्या नाहीत.

गृहनिर्माण विभागाच्या दि.०३.०९.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. तसेच सदरहू पदांवर शासकीय /निमशासकीय अधिका-यांची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली छाननी समिती गठीत करण्यात आली आहे. तद्‌नंतर सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८

रोजीच्या शासन निर्णयांन्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपद्धती याबाबतचे धोरण निश्चित केले आहे. त्यास अनुसरुन गृहनिर्माण विभागाच्या दि.१८.०३.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन व गृहनिर्माण विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयांतील अटी व शर्तींनुसारच सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयातील प्रतिनियुक्तीच्या पदावर नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे प्राधिकरणात वर्षानुवर्षे एकाच पदावर असूनही बदली न झाल्यामुळे प्राधिकरणात प्रशासकीय मुजोरी वाढत जाते, ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.

त्याचबरोबर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयातील उप मुख्य अभियंता यांना तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्यात आलेली असल्याने शासनाच्या बदली धोरणाचे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे उल्लंघन होत असल्याची तसेच प्रतिनियुक्तीच्या नियमांना पायदळी तुडवत असल्याची बाब खरी नाही.

*********